MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Issue-23, Vol-.04 January to March- 2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
Dist. Nanded

14) Identifying Entrepreneurial Talents of School Students By .......
Mrs. M. Aakina Barveen, Dr. I. Mohammed Shaw Alem || 68

15) USE OF CLOUD COMPUTING IN LIBRARY FIELDS
Dr. K. Choudhary, Dr. G.S. Patel, Dr. O.P. Patel || 71

16) THE CHANGING STATUS OF TRANSGENDER IN INDIA
Kanak Priya || 76

17) Kanshi Ram and his BAMCEF for Bahujans in India
Dr. Rajesh Chandra Ranjan || 83

18) Gandhi's Satyagraha and Swaraj
Om Prakash Sharma || 89

19) ई-शासन : संकल्पना आणि आव्हाने
प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव || 94

20) स्त्री सक्षमीकरणात बचत गट योजनेचे योगदान
प्रा. निलेश अ. फटींग || 97

21) तौलनिक साहित्य : तात्त्विक मीमांसा
प्रा. डॉ. प्रकाश ज्ञानोबा जाधव || 100

22) "प्राथमिक शिक्षकांची अध्यापन अभिवृत्ती आणि कार्यतत्परता यांच्यातील .......
प्रा. डॉ. सौ. देवानंदा पारस सांखला, सौ. जयश्री सुदाम बागले || 103

23) प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि चिंता .......
प्रा. डी. झेड. चोधरी || 105

24) प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता .......
प्राचार्य डॉ.सौ.लता सुभाष मोरे, जितेंद्रगीर विश्वासगीर गोसावी || 107

25) इयत्ता पाचवीच्या इंग्रजी विषयाच्या अध्यापनासाठी सर्जनशील अध्यापनाचा .....
प्राचार्य डॉ.सौ.लता सुभाष मोरे, वनमाला महारु पवार || 109

26) प्राचीन भारतातील शिक्षा पध्दति
प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव || 111

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

UGC Approved Sr.No.62759

Vidyawarta®

Jan. To March 2018
Issue-23, Vol-04



19

# ई-शासन : संकल्पना आणि आव्हाने

प्रा. डॉ. लकडे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**प्रस्तावना :-**

भारतीय शासन व्यवस्थेत अलीकडे सर्वच क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर अधिक प्रमाणात वाढत आहे. माहिती तंत्रज्ञानाने सर्व क्षेत्राला प्रभावित केले. यामुळेच ई-शासन, ई-प्रशासन, ई-लोकशाही, ई-अर्थव्यवस्था, ई-बाजार अशा विविध संकल्पनांचा उदय होत आहे. संगणक, इंटरनेट, ईमेल, कॉलसेंटर, टेलिफोन यांसह अनेक दूर संचार साधनांचा वापर शासन व प्रशासनात कार्यकुशलतेसाठी होत आहे. यामुळे शासन व प्रशासन व्यवस्थेतील पारदर्शकता, प्रभावशालीपणा व जबाबदारी वाढत आहे. कमी वेळेत व कमी खर्चात अधिक गुणात्मक सेवा देऊन भ्रष्टाचार व लालफितशाही यासारख्या समस्यांना कमी करण्याचा प्रयत्न ई-शासनात होत आहे. ई-शासनाने शासनात नागरिक केंद्रित, सर्वंकष आणि प्रभावी बनले. ई-शासनाने शासनाला गुणात्मकतेत रुपांतरित केले. ई-शासनाची उपयुक्तता लक्षात घेऊन त्याचा वापर इतर क्षेत्रात केला जात आहे. तरी अपेक्षेनुसार निकाल मिळत नाही. कारण भारतीय शासन व्यवस्थेतील अनेक घटक प्रथा, परंपरा, अज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या प्रचार प्रसारातील भौगोलिक अडचणींचा अडथळा मोठा आहे. या सर्व अडथळ्यांमुळे भारतात ई-शासनाची अंमलबजावणी करण्यात व त्याचे उद्देश पूर्ण होत नाहीत. त्यामुळे या सर्व समस्यांचे समाधान करणे आवश्यक आहे. जेणेकरून ई-शासनाचे सर्व उद्देश पूर्ण करता येतील.

**ई-शासन संकल्पनात्मक विवेचन :-**

ई-शासन म्हणजे ई-गव्हर्नन्सच्या निर्मितीतील पहिली पायरी होय. यात जनतेपर्यंत शासकीय सुविधा आणि त्याची माहिती पोहचवण्यासाठी विविध इलेक्ट्रॉनिक साधनांची मदत घेतली जाते. त्याअर्थाने ई-शासन माहिती तंत्रज्ञानाचे एक विकसित तंत्र आहे. ज्याचा वापर शासकीय कामकाजात करून शासनाच्या प्रक्रियेला सरळ, पारदर्शक, उत्तरदायी, जबाबदार व संवेदनशील बनवले जाते. ई-शासन शासन व्यवस्थेला शासकीय व नैतिक बनवण्याचे एक माध्यम आहे.

**ई-शासनाचे प्रयत्न :-**

भारतात माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रचार व वापरासाठी १९५६ ला पहिला संगणक आला. ज्याला कलकत्त्यातील भारतीय सांख्यिकी संस्थेत ठेवण्यात आले. तरी भारतात ई-शासनाची खरी सुरुवात १९७० ला इलेक्ट्रॉनिक्स विभाग आणि १९७६ ला राष्ट्रीय माहिती केंद्राची स्थापना करून झाली. राष्ट्रीय माहिती केंद्राने संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या मदतीने इलेक्ट्रॉनिक विभागाने प्रारंभ केले. त्या मार्फत देशातील सर्व जिल्ह्यांना भारताशी जोडण्याचे महत्वपूर्ण कार्य करण्यात आले. १९८० पर्यंत भारतातील सर्व शासकीय कार्यालयात संगणक आणले. परंतु त्याचे कार्य फक्त आकडेवारीची माहिती घेण्यापुरतेच मर्यादित होते. भारतीय ई-शासनात अधिक वाढवण्यासाठी १९८७ ला राष्ट्रीय उपग्रहावर आधारित संगणक नेटवर्कचा प्रारंभ केला. ज्याचा परिणाम देशातील सर्व जिल्हा कार्यालयांना संगणकीकृत करण्याच्या हेतूने राष्ट्रीय माहिती केंद्राच्या मदतीने जिल्हा माहिती केंद्र बनवले. यासाठी राज्य शासनास मोफत हार्डवेअर माहिती केंद्राची स्थापना करण्यात आली.

या सर्व प्रयत्नांतील सर्वात महत्वाचा प्रयत्न म्हणजे १९९९ ला भारत शासनाकडून केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. २००० साली सर्व केंद्रीय मंत्रालय आणि विभागात ई-शासनाला कार्यान्वित करण्यासाठी १२ सूत्री कार्यक्रम बनवण्यात आला. विशेष म्हणजे १५ ऑगस्ट २००० ला केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्रालयात एक वेगळे ई-शासन केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्राच्या वतीने संपूर्ण भारतात ई-शासन संकल्पनेचा विस्तार करण्याचे कार्य करण्याचे ठरले. ई-शासन ही संकल्पना व्यवहारात राबवण्यात २१ व्या शतकातील भारत हा एक महत्वाचा देश आहे. या देशाने ई-शासन संकल्पनेला कायदेशीर आधार व मान्यता दिली. ज्यास संपूर्ण देशात १८ ऑक्टोबर २००० पासून लागू केले. या कायद्याने माहिती व तंत्रज्ञानाचा विस्तार झाला. तसेच सायबर गुन्ह्यात होणारी वाढ रोखण्यासाठी नियंत्रण करण्याची व्यवस्था करण्यात आली. ई-शासनाची वाढती उपयोगिता, महत्व आणि विस्ताराची तीव्र गती पाहून वर्ष २००१ हे वर्ष संपूर्ण भारतात ई-शासन वर्ष म्हणून साजरा करण्यात आला. भारत शासनाकडून १८ मे २००६ ला राष्ट्रीय ई-शासन योजनेस मान्यता देण्यात आली. या योजने अंतर्गत संपूर्ण भारतात ई-शासनाची अंमलबजावणी करण्यासाठी ३१ मिशन मोड योजना बनवण्यात आली. नागरिक हा या योजनेचा केंद्रबिंदू होता. या योजनेने लोकांच्या काम करण्याच्या पद्धतीत बदल केला. एक खिडकी योजनेचा प्रारंभ करण्यात आला. ज्याद्वारे एकाचवेळी अनेक सुविधा व योजनांचा लाभ नागरिकांना



Scanned by CamScanner

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR * Dist.Nanded *

मिळाला. या योजनेमुळे कोणताही नागरिक आपल्या घरात राहून कमी खर्चात व कमी वेळेत अधिकाधिक चांगल्या व लोकोपयोगी सुविधांचा लाभ घेवू शकतो. यामुळे कार्यकुशलता, पारदर्शकता व विश्वसनीयतेस सुनिश्चित करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

अशाप्रकारे भारत शासनामार्फत ई-शासनास सुशासन निर्माण करण्याचे एक साधन म्हणून वापरण्यात येत आहे. जेणेकरून शासन, प्रशासन, शहर, ग्राम या सर्वांना स्मार्ट व डिजिटल बनवता येईल. तरीही भारतीय परिप्रेक्ष्यात ई-शासनास पूर्णपणे लागू करणे सहज शक्य नाही. कारण भारत हा खेड्यांचा देश आहे. ज्याची सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय स्थिति ई-शासनाच्या अंमलबजावणीसाठी अनुकूल नाही. कारण त्यासमोर अनेक प्रकारच्या समस्या आहेत. या समस्या कशा सोडवाव्यात हा शासनासमोरील एक मोठा प्रश्न आहे.

प्रस्तुत शोधलेख ई-शासनाची संकल्पना, त्यांच्या प्रसारासाठी भारत शासनाकडून झालेले प्रयत्न व त्यासमोरील समस्यांना समजून घेण्याच्या हेतूने लिहिण्यात आले. या लेखातील दोन मुद्यांची माहिती वरीलप्रमाणे आहे. यानंतर ई-शासना समोरील आव्हानांना समजून घेवूया. या आव्हानांत अनेक आव्हानांचा समावेश करता येतो. परंतू अभ्यासाच्या सोयीसाठी व आपणास समजण्यास अधिक सोपे व्हावे म्हणून त्याची विभागणी तंत्रज्ञान, आर्थिक व सामाजिक आव्हानात करण्यात आली.

**१) तांत्रीक समस्या :-**

ई-शासनाची संकल्पना तंत्रज्ञानाशी संबंधित आहे. बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाच्या साधनात बदल होत आहे. तसेच त्याचा वापर करण्याच्या प्रक्रियेतही अधिक बदल होत आहेत. ज्याचा प्रभाव प्रत्येक कार्यालयाच्या कार्य पध्दतीवर पडत आहे आणि त्यांच्या कार्यपध्दतीत बदल होत आहे. काही कार्यालय व ऑफिसमध्ये नवीन तंत्रज्ञान लवकर उपलब्ध होत आहेत. कारण चांगले कार्य होईल तर कांही कार्यालयात जुन्यात तंत्रज्ञानाच्या साहाने कार्य होत असल्यामुळे कामाची गती मंदावते. कार्य पध्दती व तंत्रज्ञान प्रणालीतील बदलामुळे व सातत्यपुर्ण नाविन्यतेमुळे कार्यालयाच्या कार्यात सामंजस्य व समन्वय राहत नाही. कार्यात अनेक अडचणी येतात.

ई-शासन या योजनेला संपुर्ण भारतात लागू करण्याचा कालावधी २०१२ पर्यंतचा होता. परंतू त्या कालावधीत ही योजना पुर्ण झाली नाही. वेळेच्या आत योजना पुर्ण न होणे ही एक फार मोठी समस्या आहे. त्यासाठी शासनाने कोणतीही योजना पुर्ण करण्यासाठी त्यास लहान-लहान भागात विभाजीत करावे. तसेच या योजनांना लहान-लहान कालावधीत पूर्ण करण्याचे ध्येय ठेवावे. परिणामतः संपूर्ण योजना वेळेच्या आत पूर्ण होते.

ई-शासनास कोणत्याही कार्यालयामार्फत क्रियान्वित करण्यासाठी इंटरनेटच्या माध्यमातून सेवा व सुविधा उपलब्ध केल्या जातात. आजच्या युगात मोबाईलचा वापर संगणकापेक्षा अधिक होत आहे. मोबाईलच संगणक बनत आहे. त्यामुळे ॲप्स, इंटरनेट, फोन, संगणक इत्यादीच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध कराव्यात. ज्यामुळे लोक आपल्या सुविधा व माहितीनुरुप त्या सेवांचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही साधनांचा वापर करण्यास ते स्वतंत्र असतील.

भारतात अलिकडे प्रत्येक व्यक्तिमार्फत ई-शासनाशी संबंधित साहित्याचा वापर होताना जाणवतो. अशावेळी त्यातुन मिळणाऱ्या माहितीची गोपनियता व सुरक्षेची भिती निर्माण होते. लोकांमध्ये एक प्रकारची भिती निर्माण होते की, त्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक जीवनाशी संबंधित माहिती व आकडेवारी सार्वजनिक होवून त्याचा दुरुपयोग तर होणार नाही ना. त्यामुळे बँक, रेल्वे, इन्कम टॅक्स, आरोग्य, आधार यासह महत्वाच्या बाबींशी संबंधित कार्य पध्दती स्पष्ट करण्याबाबत ती माहिती पूर्णपणे सुरक्षित असल्याची खात्री जनतेला करुन द्यावी लागेल. जर लोकांना सुरक्षेची शाश्वती मिळाली तर लोक स्वतःहून अधिकाधिक ई-शासनाचा वापर करतील.

**२) आर्थिक समस्या :-**

ई-शासन या योजना आणि अर्थव्यवस्थेचा फार जवळचा संबंध आहे. आर्थिक गुंतवणुकीशिवाय कोणताही देश ई- शासन ही संकल्पना आपल्या देशात राबवु शकत नाही. भारतासारख्या विकसनशील व अधिक लोकसंख्या असणाऱ्या देशात ई-शासन तसे कठीणच. परंतु भारत शासन अनंत अडचणींना दूर करत ई-शासन योजना यशस्वी करण्याचे ठरवले. तसे अनेक प्रयत्न व योजनाही झाल्या. तरीही भारतात मागील २५ वर्षांत ही योजना पुर्णपणे यशस्वी झाली नाही. त्याचे अनेक कारण आहेत. त्यापैकी या योजनेच्या निर्मितीत होणाऱ्या गुंतवणुकीचा अभाव, झालेल्या गुंतवणुकीत होणारा भ्रष्टाचार, गुंतवणुकीचा वापर कसा करावा. याचे नसलेले अर्थशास्त्रीय ज्ञान, व्यक्तिच्या उत्पन्नात होणारी घसरण, मुलभूत गरजेच्या वस्तूंवर खर्च करण्यात होणारी तारांबळ, माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांत दिवसांगणिक सुधारणा होत आहे, त्या सुधारित साधनांचे खरेदीकरण करण्यात येणारी आर्थिक अडचण, जुन्या माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांची गती दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे आर्थिक कामात दिरंगाई होते. उपकरणात बदल करुन त्यांचे नाविन्यकरण करण्यात प्रशासन व शासनासमोर अनेक अडचणी येतात. उत्पन्नाच्या स्त्रोत नसल्यामुळे ई-शासनाशी संबंधित सर्व उपकरणे खरेदी करण्याची आर्थिक कुवत भारतीय नागरिकांत दिसून येत नाही. त्यामुळे आवश्यक आहे की, भारत सरकारद्वारा योग्य आर्थिक धोरण स्विकारुन प्रति व्यक्ती उत्पन्न



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI MANDAL SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



वाढवण्यावर भर द्यावा. तरच भारतातील गरिबांतील गरिब व्यक्ती व लहानातील लहान कार्यालय व ऑफिसमध्ये ई-शासनाशी संबंधित सुविधा व साधनांचा वापर होईल.

**३) राजकीय समस्या :-**

ई-शासन हे एक धोरण आहे. कोणत्याही धोरणाची अंमलबजावणी व यशस्विता हे त्या देशाच्या राज्यव्यवस्थेच्या स्वरुपाशी अधिक संबंधित आहे. ज्या देशात लोकशाही शासन व्यवस्था आहे, तिथे ई-शासनासारखे विकासाभिमुख व पारदर्शक शासनाशी निगडीत धोरणांची अंमलबजावणी शासन स्वतः करते. तरीही हे त्याच लोकशाही शासनात होते, जिथे राजकीय नेतृत्व व लोकप्रतिनिधी यांच्यात ई-शासनाप्रती जवळीकता, आत्मीयता व त्याच्या विकासाशी असणारा संबंध याचे चित्र स्पष्ट असते. राजकीय स्पर्धा व विरोधाच्या भावनेतून ई-शासनासारख्या योजनेस विरोध करण्यासाठी विरोधाचे राजकारण होणाऱ्या देशात ई-शासन यशस्वी होत नाही. ई-शासन संकल्पनेचा वापर राजकीय सुडाच्या भावनेने होणाऱ्या देशात ही संकल्पना यशस्वी होणार नाही. राज्यव्यवस्था व राजकारणात गुन्हेगारी, भ्रष्टाचारी व लोकशाही विरोधी लोकांचा सहभाग असेल तर ई-शासन संकल्पना शासन व प्रशासनात राबवावी अशी भुमिका कोणी घेणार नाही.

**४) सामाजिक समस्या :-**

ई-शासन ही योजना यशस्वी करण्यात आर्थिक, तांत्रिक, राजकीय समस्येसह सामाजिक समस्या हा महत्त्वाचा भाग आहे. विशेषतः भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सामाजिक क्षेत्रात अनेक समस्या आहेत. ज्यात भाषिक, जातीय भिन्नता अज्ञान, संगणकीय साधनांना समजुन घेण्याच्या ईच्छाशक्तीचा अभाव ईत्यादीचा समावेश होतो. ई-शासनाच्या माध्यमातून प्रामुख्याने इंग्रजी भाषेचा अधिक वापर होत असतो. इंग्रजी भाषेबाबत लोकांची उदासीनता, अधिक असते. ई-शासनात अधिकाधिक अर्ज इंग्रजी भाषेतच स्विकारले जातात. त्यामुळे ई-शासनाचा प्रयोग प्रादेशिक भाषेतून करावा. ज्यामुळे लोकांना त्यास समजून घेवून कार्य करणे अधिक सुलभ होईल. भारतात ई-शासनाशी संबंधित तंत्रज्ञानास समजुन घेण्यास किंवा त्यास शिकण्यात लोकांचा रस कमी आहे. त्यास पूरक असे शिक्षणच लोकांकडे नसल्याचे बऱ्याच सर्व्हेक्षणातून स्पष्टपणे दाखवतात. २०११ च्या जनगणनेनूसार साक्षरतेचे प्रमाण ७४.०७% आहे. तर संगणकाच्या साक्षरतेचे प्रमाण ६.००% आहे. भारतातल्या ७०% लोकांकडे फोन असूनही त्यांना संगणकाचे ज्ञान नसणे ही आश्चर्यकारक आहे. ई-शासनास अधिक सफल व कार्यान्वन बनवण्यासाठी या ७०% लोकांना ई-शासनाच्या साधनांचे प्रशिक्षण व शिक्षण द्यावे. भारतीय लोकांतील धार्मिक अंधश्रध्दा, अज्ञानामुळे ई-शासनाची उपयुक्तता याबाबत अज्ञान आहे. ई-शासनामार्फत जीवनावश्यक गरजांपासून ते शासनाच्या कोणत्याही कार्यास सहज सुलभ व परिणामकारकपणे करता येते. हेच मुळात बऱ्याच लोकांना मान्य नाही. ई-शासनाच्या साधनांमार्फत घेणारी कार्य चुकीचीच असतात असे मानणारा एक वर्ग आहे. या वर्गातील ई-शासनासंबंधीचे समज-गैरसमज दूर करुन त्यांच्यात त्याबाबतचा विश्वास जागृत करणे आवश्यक आहे. तरच ई-शासन योजना यशस्वी बनते. ई-शासनामार्फत शासनाच्या अनेक वेबसाईट दर्शवल्या जातात. त्या सहजासहजी लोकांना कळत नाहीत. त्या फार किचकट व गुंतागुंत असतात. त्याची भाषाशैली, वाक्यरचना, माहिती टाकण्याची व ती मिळवण्याची प्रणाली यात सहजता असावी. तसेच ई-शासनामुळे शासनाचे कार्य अधिक कुशल झाले. त्याची प्रभावकारकता वाढली. परंतू जोपर्यंत ते लोकांपर्यंत १००% पोहचणार नाही तोपर्यंत लोकांना सुविधा मिळणार नाहीत. प्रत्येक नागरिकाला प्रत्येक प्रकारच्या सुविधा मिळाव्यात. भारतात इंटरनेट वापरणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. तरीही बऱ्याच जणांना ई-शासनाचा वापर करता येत नाही. काही लोकांची यात सहभागी होण्याची इच्छा आहे. परंतू त्यांना पुरेसे साहित्य मिळत नाहीत.

भारतीय शासन ई-शासनाच्या मदतीने कागदविरहीत शासन व प्रशासनाच्या निर्मितीच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी शास्त्रज्ञामार्फत अनेक नवनवीन शोध लावले जातात. शासन त्यांना मान्यता देते. परंतु या सर्वांचा वापर करणे नागरिकांना कठीण आहे. या साधनांचा वापर करून शासनाशी संवाद साधणे लोकांना बोजड वाटते. त्यामुळे नागरिक, कर्मचारी, व्यापारी यांना त्यास समजुन ही त्यासाठी संघर्ष करावा लागतो.

भारताची २०११ ची लोकसंख्या १.२ अरब होती. २०१६ मध्ये ती १.३ अरब आहे. एवढ्या लोकसंख्येला ई-शासनाशी संबंधित साधने पुरवुन त्यात तरबेज करणे अधिक कठिण आहे. ई-शासनाबाबत या लोकांत बरेच अज्ञान आहे. त्यांना जागरुक करावे लागेल. दैनंदिन जीवनात सर्वचजण ईलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करतात. परंतु ई-शासन आधारित सेवांच्या देवाण-घेवाणीप्रती अधिक जागरुक नाहीत. त्यासाठी दुरदर्शन, वर्तमानपत्र, रेडिओ, नियतकालिके, टेलिव्हीजन यासह शक्य असेल त्या दृश्य किंवा दृकश्राव्य माध्यमांचा आधार घेवून ई-शासनाबाबत जनजागरुकता करावी लागेल.

अशाप्रकारे भारताने ई-शासनात मागील दोन ते तीन दशकांत बरीच प्रगती केली. ईतर कांहीच्या तुलनेत परंतू भारतातील इतरांचा विचार करता ही प्रगती चिंताजनकच वाटते. भारतातील एक वर्ग जो श्रीमंत, श्रेष्ठता व भांडवलदार आहे. त्यांच्या जन्मलेल्या मुलाला ई-शासनाशी संबंधित सर्वच साधनांची तोंड ओळख व पुरेपुर ज्ञान बालवयातच मिळते. परंतु मध्यमवर्ग आणि गरिबांच्या जीवनात ई-



Scanned by CamScanner

शासनाची साधनांची वाणवा आहे. मोबाईल सोडून, ई-शासनाच्या प्रचारात सर्वच घटकांनी आपले योगदान द्यावे लागेल. ई-शासन आणि विकास असा सहसंबंध जोडुन त्यांच्या फायद्याबाबत लोकांना सांगावे लागेल. त्यासाठीची गुंतवणुक वाढवावी लागेल. कमी वेळात, कमी खर्चात, कमी मेहनतीने ई-शासनाच्या साधनांच्या साह्याने जीवन व राष्ट्र आवश्यक सर्वच कामे होतात हा संदेश एकदा लोकांपर्यंत जावा ते खरेदी करण्याइतपतचे आर्थिक सामर्थ्य व त्यास समजून घेण्याचे बौध्दिक सामर्थ्य जनतेत येणे काळाची गरज आहे.


१) सूचधा का अधिकार-अपेक्षाएँ और चुधौतियां-प्रा.रमेश जैन, धापू लाल गुर्जर-सबलाइम पब्लिकेशध्स, जयपूर०६.

२) माहिती अधिकार-फडके य.दि.-अक्षर पब्लिकेशध्स

३) Recent Trends in public administration-Dr.Preeti Pohekar-Aruna Prakashan, Latur-२०१०.

४) Right to information and Good Governance-S.L. Goel, Deep & Deep Publications Pvt. Ltd. New Delhi-२००१.

५) लोकप्रशासध-एम.लक्ष्मीकांत-Tata MC-Grow Hill Education, Private Limited, New Delhi.

६) माहिती अधिकार-प्रा.व्हि.बी.पाटील, के. सागर पब्लिकेशध्स, पुणे.

७) २१ वी शताब्दी में लोकप्रशासध - अशोक कुमार दुबे-Tata MC-Grow Hill Education, Private Limited, New Delhi.

८) प्रशासध एवं लोकधिती-संपादक-मधोज सिध्हा, ओरिएंट ब्लैकस्वाध-२०१०-ध्यु दिल्ली.

९) Understanding Contemporary Issues in India-Vivek S. Raj-Civil Services Times.

१०) The Indian Journal of Political Science-January-March-२०१३-Editor Madhurendra Kumar.

११) भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्धिपरिक्षा-लेखक-माधव गोडबोले, अधुवाद सुजाता गोडबोले-राजहंस प्रकाशध, पुणे-२०१२.

१२) भारत में भ्रष्टाचार और उससे मुकाबला-संतोषकुमार अग्रवाल-राधा पब्लिकेशध्स, धई दिल्ली-२००७.

१३) माहितीचा अधिकार-२००५-आण्णा हजारे, भ्रष्टाचार विरोधी जधआंदोलध ध्यास-२००९.


□□□

20

# स्त्री सक्षमीकरणात बचत गट योजनेचे योगदान


प्रा. निलेश अ. फटींग
(सहाय्यक प्राध्यापक)
राज्यशास्त्र विभाग
कमला नेहरू महाविद्यालय सक्करदरा, नागपूर


**********

रावे शतक ''स्त्री सबलीकरण' म्हणून घोषित करण्यात आले. वैश्विकरणाच्या भौतिकवादी युगात स्त्रिया वेगवेगळया क्षेत्रात उडी घेत आहेत.'' त्या राजनैतिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक, धार्मिक, प्रशासनिक सैनिकी यासारख्या क्षेत्रांमध्ये लहानापासून तर मोठमोठया पदापर्यंत गौरवपूर्ण स्थान प्राप्त करत आहेत. महिलांच्या प्रगतीतच कुटुंब, समाज, राष्ट्राची प्रगती असते. स्त्रियांना शिक्षित बनवून समाज पागळा बनवण्यापासून वाचवता येतो.

अंतरिक्षात प्रवेश करणाऱ्या कल्पना चावला व सुनीता विल्यम्स भारताच्या मूळ रहिवासी आहेत. क्रीडा क्षेत्रात सुध्दा पी.टी. उषा, सुनीता कुमारी, कर्णम मल्लेश्वरी, सानिया मिर्झा, सायना नेहवाल यांनी अप्रतिम कार्य केले.

साहित्याच्या क्षेत्रात अमृता प्रीतम, महादेवी वर्मा, अम्मा लाहिरी, मृणाल पाण्डेय, अरूंधती रॉय, किरण देसाई यांनी तर बुकर पुरस्कार मिळवून भारताचे नाव जगात उंचावले. कलेच्या क्षेत्रातही स्त्रिया आपली योग्यता सिध्द करत आहे.

भारतात सरकारी व निमसरकारी संस्था कार्यरत आहेत. महिला सशक्तीकरणासाठी राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोग कार्यरत आहेत. हे सर्व आयोग महिलांना प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.[१]

सबलीकरणामुळे स्त्री निर्भयपणे बोलू लागली



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner